KAYASTH
Caters & Event Management



Rajendra Deochand Kayasth-9657572742 | 7350565657
Karanja Chowk,Shiv Shopping Complex,Buldana-443001



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN



संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा



संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com



वर्ष २ रे    अंक : ६४२. वा    शुक्रवार    दि. ०५ जानेवारी २०२४    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये


# महिलेच्या गर्भपात प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल...

# जिल्हा सामान्य रुग्णालय व स्त्री रुग्णालय विविध मालीका सत्र सुरूच

## जिल्हा स्त्री रुग्णालयात घडला होता प्रकार,आरोग्य विभागाची लक्तरे उघड...

**जनसंचलन/ बुलढाणा**

मोठा गाजावाजा करून स्थापन करण्यात आलेल्या बुलढाण्यातील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या गलथान कारभाराची लक्तरे अक्षरशः वेशीवर टांगली जात आहेत. काही दिवसांपूर्वी एका महिलेच्या चुकीच्या इलाजामुळे गर्भपात झाला होता. संबंधित महिलेने आता थेट बुलढाणा शहर पोलिस स्टेशनला या संदर्भात तक्रार दाखल करून पीडित महिलेने कारवाईची मागणी केली आहे. काही दिवसांपूर्वी याच हॉस्पिटलचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक सचिन वासेकर हे एसीबीच्या ट्रॅपमध्ये अडकल्याने या रुग्णालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहार उघड झाला होता. बुलढाण्यात एक जिल्हा स्त्री रुग्णालय व्हावे, अशी अनेक वर्षांची मागणी होती. काही महिन्यांपूर्वी बुलढाणेकरांची ही मागणी पूर्ण झाली आणि शाससन तसेच सीएसआर फंडाच्या संयुक्त प्रयत्नांमधून हे हॉस्पिटल उभे झाले. खरे तर हे रुग्णालय जिल्ह्यातील महिलांच्या आरोग्यासाठी वरदान ठरणे अपेक्षित होते. मात्र, सुरवातीपासूनच या रुग्णालयाला भ्रष्टाचाराची वाळवी पोखरते आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे भ्रष्टचारात महाराष्टभर गाजलेले जिल्हा सामान्य रुग्णालयात राहून वर्षानुवर्षे भ्रष्टाचार करणारे डॉ. सचिन वासेकरांसारखे महाभाग या ठिकाणी वैद्यकीय अधीक्षक बनले.

**पोस्टमार्टम ६०**

या ठिकाणच्या भ्रष्टाचारासंदर्भात सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने काही दिवसांपूर्वी आपल्या वृत्तमालिकेत वृत्तदेखील प्रकाशित केले होते. या जिल्हा स्त्री रुग्णालयात काही महिन्यांपूर्वी जालना जिल्ह्यातील एक सहा महिन्यांची गर्भवती महिला भर्ती झाली होती. गर्भपिशवीला टाके मारण्यासाठी या महिलेला भर्ती करून घेतले होते. परंतु या रुग्णालयातील बेजबाबदार गलथानपणा व भ्रष्टाचारी प्रवृत्तीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे या महिलेला चुकीचा इलाज दिला गेला. या प्रकारामुळे महिलेचा गर्भपात झाला. या घटनेमुळे संबंधित महिलेच्या कुटुंबावर चांगलीच शोककळा पसरली. या घटनेची जबाबदारी घेण्यावरून स्त्री रुग्णालय प्रशासनात चांगलीच सुंदोपसुंदी माजली होती. डॉ. सचिन वासेकर यांच्यासह जे प्रस्थापित डॉक्टर आहेत, त्यांनी कंत्राटी डॉक्टरांवर हे प्रकरण शेकण्याचा तसेच काहीही करून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला, परंतु वासेकरांचा हा प्रयत्न फसला त्यांची विकेट गेली.

दरम्यान, या घटनेप्रकरणी आता पीडित महिलेने थेट शहर पोलिस स्टेशनला तक्रार दाखल करून दोषींविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलिस या प्रकरणात आगामी काळात काय कारवाई करतात, हे समोर येईलच, परंतु या प्रकरणाने जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या कारभाराची लक्तरं मात्र बाहेर आणली आहेत. खरे तर संपूर्ण जिल्ह्याचा आरोग्य विभागच गेल्या काही वर्षांमध्ये भ्रष्टाचाराचे सर्वांत मोठे कुरण बनल्याचे दिसत आहे. जिल्ह्यातील विविध रुग्णालयांमध्ये भ्रष्टाचाराने थैमान घातले आहे. यातही जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्हा स्त्री रुग्णालय चांगलेच अग्रेसर आहे. काही दिवसांपूर्वी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज ने बातमी प्रकाशित करून या रुग्णालयातील गलथानपणा समोर आणला होता. या रुग्णालयातील अनेक डॉक्टर हे केवळ कागदोपत्री रुग्णालयात हजर असतात. जास्तीत जास्त कारभार हा कंत्राटी डॉक्टरांवर भागवण्यात येत आहे. येथील भांडारपालाने रुग्णालयाची स्टेशनरी व अनेक उपकरणे व वस्तूंमध्ये मोठा हेरफेर केला आहे. नवीन आलेल्या भांडारपालाला कशाचीही माहिती नसते. आलेल्या रुग्णांची योग्य ती काळजी




घेतली जात नाही. रुग्णालयात योग्य त्या प्रमाणात औषधे नसणे व उपकरणांची कमतरता, याची तर रोजचीच रडारड असते. ही संपूर्ण स्थिती पाहता जिल्ह्याच्या आरोग्य विभागावर एक मोठी सर्जरी करणे गरजेचे आहे. त्याशिवाय हा भ्रष्टाचार कधीही नष्ट होऊ शकत नाही, अशी स्थिती आहे. सर्वसामान्यांच्या हितासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज जोरदार प्रयत्न करणार असून, भ्रष्टाचाऱ्यांची पोलखोल करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झाल्याशिवाय सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन शांत बसणार नाही.

# २० वर्षीय तरूणाने अल्पवयीन मुलीचा केला विनयभंग...

**जनसंचलन/ खामगाव**

रस्त्याने जात असलेल्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा एका युवकाने रस्त्यात अडवून विनयभंग केल्याची घटना शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयासमोर सोमवारी घडली. याप्रकरणी तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. एका गावातील अल्पवयीन मुलगी १ जानेवारीला काम आटोपून रस्त्याने जात होती. दरम्यान, तिच्या गावातीलच विठ्ठल शांताराम व्यवहारे (वय २०) याने तिचा पाठलाग करून तिला अडविले. तसेच तुला गाडीवर सोडून देतो, तू मला खूप आवडते असे म्हणून गैरवर्तन करीत तिचा विनयभंग केला. याबाबत मुलीने वडिलांना सांगितले. मुलीच्या वडिलांनी शहर पोलिस ठाण्याला तक्रार दिली. यावरून पोलिसांनी



विठ्ठल शांताराम व्यवहारे याच्याविरुद्ध कलम ३४५, (डी), ३४१, भादेवी सहकलम ११ ( व्हीआय) १२ पोक्सोनुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत.


बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वन बुलढाणा मिशनच्या संवाद मेळाव्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद...

## पहूरपूर्णा, रायगाव, भेंडवळ येथील ग्रामस्थांसोबत संदीप शेळकेंनी साधला संवाद...

जनसंचलन /बुलढाणा

वन बुलढाणा मिशनच्या जाहीरनामा जनतेचा कार्यक्रमांतर्गत शेगाव तालुक्यातील पहूरपूर्णा, लोणार तालुक्यातील रायगाव व जळगाव जामोद तालुक्यातील भेंडवळ येथील संवाद मेळाव्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संदीप शेळके यांचा विकास आणि परिवर्तनाच्या विचार जिल्हावासीयांना भावला. राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष तथा वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके गावोगावी जाऊन जनतेशी संवाद साधत आहेत. नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी १ जानेवारीला शेगाव तालुक्यातील पहूरपूर्णा, २ जानेवारीला लोणार तालुक्यातील रायगाव आणि ३ जानेवारीला जळगाव जामोद तालुक्यातील भेंडवळ येथे संवाद मेळाव्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्याचा ध्यास घेऊन वन बुलढाणा मिशन ही लोकचळवळ कार्यरत आहे. याअंतर्गत जाहीरनामा जनतेचा ही संकल्पना मांडली आहे. राजकीय पक्ष आपला जाहीरनामा आणतात. संदीप शेळके जनतेचा जाहीरनामा आणणार आहेत. जिल्ह्याचा विकास कसा हवा, हे जनतेने ठरवावे, अशी त्यांची भूमिका आहे. त्यासाठी गावोगावी जाऊन ते जिल्हावासीयांशी संवाद साधत आहेत. पहूरपूर्णा, रायगाव, भेंडवळ या तिन्ही सभेला माता- भगिनी, युवक, ज्येष्ठ नागरिक प्रचंड संख्येने हजर होते. जिल्ह्यातील नागरिकांना परिवर्तन हवे आहे, बदल हवा आहे. लोकप्रतिनिधींनी केवळ आश्वासने दिली. आमच्या अनेक समस्या, आमचे अनेक प्रश्न जैसे थे असल्याच्या भावना यावेळी ग्रामस्थांनी बोलून दाखवल्या. जिल्ह्याच्या विकासाचा ध्यास असलेल्या वन बुलढाणा मिशन या लोकचळवळीसोबत राहण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला. जिल्ह्यात रोजगार, सिंचन, शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणी, वीज असे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. जिल्ह्यात चांगल्या एमआयडीसी नाहीत. मोठे उद्योग नाहीत. एकही साखर कारखाना नाही, सूतगिरणी नाही, दुधसंघ नाही. त्यामुळे युवकांना रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही. राजकारणी मंडळी याकडे गांभीर्याने बघत नाहीत. राजकीय इच्छाशक्तीअभावी जिल्ह्याचा विकास मंदावला असा, घणाघात संदीप शेळके यांनी केला.



## युवकांना रोजगाराविषयी मार्गदर्शन

जनसंचलन/ जळगाव जामोद

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालय जळगाव जामोद येथे २ जानेवारी रोजी आयोजित कार्यशाळेमध्ये रोजगाराच्या संधीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा उद्योग केंद्र व श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालय वाणिज्य विभागामार्फत करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. माई होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा उद्योग केंद्र बुलढाणाचे महाव्यवस्थापक एन. एस. पाटील, राजेश लहासे, कैलास खराटे, महाविद्यालय वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. ऋषिकेश विप्रदास, भोपळे, प्रा. बावस्कर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पाटील म्हणाले, की युवकांनी स्वयंरोजगार उभारून स्वावलंबी व्हावे व इतरांनासुद्धा रोजगार उपलब्ध करून द्यावा, यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम या योजनेचा लाभ घ्यायला हवा. प्रास्ताविक कैलास खराटे यांनी केले. राजेश लहासे यांनी उद्योगजकांच्या समस्या त्यांच्या पुढील आव्हाने व मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजना व अनुदानाविषयी मार्गदर्शन केले. माळी यांनीसुद्धा रोजगारासंदर्भातील माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा. बावस्कर यांनी केले. आभारप्रदर्शन वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. ऋषिकेश विप्रदास यांनी केले. कार्यक्रमास वाणिज्य व कला विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

## मोताळा प्रेस टाइम्सच्या अध्यक्षपदी सँडीभाऊ मेढे

जनसंचलन/मोताळा

सामाजिक जाणभाण व पत्रकारितेतील भरीव योगदानाबद्दल,सकस लेखनीचे धनी पत्रकार सँडीभाऊ मेढे यांची मोताळा प्रेस टाइम्सच्या मोताळा तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे तर उपाध्यक्षपदी लोकमत समाचारचे सादिक शेख यांची निवड करण्यात आली आहे.मोताळा तालुक्यातील आपल्या सिद्धहस्त लेखणीतून सर्वसामान्यांना न्याय देण्याची कास धरणारे सँडीभाऊ मेढे पत्रकारिता क्षेत्रातील मोठे नाव मानले जाते.गेल्या ५ वर्षांपासून त्यांची



निर्भिडपणे पत्रसेवा सुरू आहे.बुलढाणा जिल्ह्यासह मोताळा तालुक्याच्या प्रश्नांवर ते सातत्यपूर्ण लिखाण करीत आहेत. त्यांच्या निर्भिड लिखाणाची दखल घेत त्यांची मोताळा तालुका प्रेस टाइम्सच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिंदी येथील शेतकरी पुत्राची गळफास घेऊन आत्महत्या...



**जनसंचलन/साखरखेर्डा**

पोलिस स्टेशन अंतर्गत शिंदी येथील युवा शेतकरी पुत्राने जानेवारी रोजी रात्री शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली आशिष प्रकाश बंगाळे (वय २६) असे मृतक युवकाचे नाव आहे आशिष बंगाळे हे १ जानेवारी रोजी रात्री आठ वाजता शेतात पाणी देण्यासाठी गेले होते शेतात पाणी तुषार सिंचनने द्यायचे असल्यामुळे याची माहिती वडिलांना होती. परंतु रात्रीचे अकरा वाजले तरीही सुद्धा आपला मुलगा आशिष बंगाळे घरी न परतल्याने वडील प्रकाश बंगाळे शेतात त्याचा शोध घेण्यासाठी गेले होते यावेळी आशिष बंगाळे हे शेतातील आंब्याच्या झाडाला गळफास घेतल्याचे आढळून आले. यावेळी त्यांनी आरडा ओरड केली असता शेताजवळील घर असलेले संदीप मोहन बंगाळे यांनी धाव घेतली सरपंच पती अशोक खरात, शंकर बंगाळे, श्रीधर खरात, संतोष बंगाळे, यांना फोन द्वारे कल्पना देऊन शेतामध्ये बोलावून घेतले. यावेळी त्यांनी तत्काळ आशिष प्रकाश बंगाळे यांना मेहकर येथील शासकीय दवाखान्यामध्ये दाखल केले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. राठोड यांनी आशिष बंगाळे यांची तपासणी केली असता त्याला मृत घोषित केले. आशिष बंगाळे याचे वडील अल्पभूधारक शेतकरी वडील ग्रामपंचायतमध्ये पाणीपुरवठा कर्मचारी आहेत. आशिषने केलेली आत्महत्या ही आर्थिक विवंचनेतून झाली असून त्याचे लग्न एक वर्षांपूर्वी झाले होते त्यांच्या पक्षात पत्नी आई-वडील, बहीण असा बराच मोठा आप्त परिवार आहे

# जितेंद्र आव्हाड यांना रामभक्त त्यांची लायकी दाखवतील-भाजपा शहराध्यक्ष अनंता शिंदे

## बुलढाण्यात आव्हाडां विरोधात भाजपची निदर्शने व प्रभूश्रीराम यांच्या प्रतिमेचे पूजण

**जनसंचलन / बुलढाणा**

भारतातील तमाम हिंदू धर्मियांचे अस्मियता व श्रद्धेचे प्रतिक असणाऱ्या प्रभू श्रीराम यांच्या बद्दल अशोभनीय वक्तव्य केल्या प्रकरणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आ.जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात आज दि.४ जानेवारी २०२४ रोजी बुलढाणा भाजपाच्या वतीने बुलढाणा लोकसभा निवडणुक प्रमुख मा.आमदार विजयराज शिंदे यांच्या मार्गदर्शनात शहराध्यक्ष अनंता शिंदे यांच्या नेतृत्वात स्थानिक वसंतराव नाईक चौकात तिव्र निदर्शने करण्यात आली व प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरभाव व्यक्त करण्यात आला. तसेच शहर पोलिस स्टेशनला निवेदन देऊन आ.जितेंद्र आव्हाड यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी भाजपा पदाधिकारी यांनी केली आहे. शिर्डी येथे झालेल्या राष्ट्रवादी पार्टीच्या बैठकीस बोलतांना आ.जितेंद्र आव्हाड यांनी प्रभू श्री रामचंद्र हे मांसाहारी असल्याचे हिंदू धर्मियांच्या भावना दुखावणारे वक्तव्य केले. या अशोभनीय वक्तव्याचा बुलढाणा भाजपणे चांगलाच समाचार घेतला. त्यांच्या प्रतिमेला काळे लावून, आव्हाडां विरोधात मुर्दाबाद च्या घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. भाजपचे बुलढाणा शहराध्यक्ष अनंता शिंदे यांनी बोलतांना सांगितले की प्रभू श्रीराम हे आचार व विचारांच्या सात्विकचे परिमाण असून ते हिंदू धर्मीयांचे आदर्श आहेत. त्यांच्या बद्दल असे अक्कलशुन्य वक्तव्य करणे म्हणजे मनोविकृतीचा कळस आहे.अयोध्या उत्सवाला गालबोट लावण्याचा हा प्रकार आहे. ही विकृती भाजपा सहन करणार नसून आव्हाडांनी प्रत्येक रामभक्त यांची माफी मागावी अन्यथा रामभक्त आव्हाडांना त्यांची लायकी दाखवून देईलद्दद्द अश्या संतप्त भावना व्यक्त केल्या. यानंतर भाजपाच्या वतीने बुलढाणा शहर पोलीस निरीक्षक प्रल्हाद काटकर यांची भेट घेऊन आव्हाडां विरोधात तात्काळ गुन्हे दाखल करून कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी प्रदेश प्रतिनिधी दीपकदादा वारे,कामगार मोर्चा प्रदेश सचिव विश्राम पवार, कामगार मोर्चा प्रदेश प्रतिनिधी अण्णासाहेब पवार, भाजपा जिल्हा सचिव सुनील देशमुख, भाजयुमो चे तालुकाध्यक्ष योगेशसिंग राजपूत, सतीश भाकरे , शरद देशमुख,मोताळा तालुकाध्यक्ष गजानन घोंगडे, तालुका उपाध्यक्ष संजय जुंबड,शहर उपाध्यक्ष प्रदीप तोटे ,किसान मोर्चा तालुकाध्यक्ष भगवान एकडे, सतीश देहाडराय, विलास खाडे,अभिषेक वायकोस महिला मोर्चाच्या वतीने जिल्हा सरचिटणीस सौ उषाताई पवार,महिला शहराध्यक्ष सौ वर्षा पाथरकर, सौ शोभाताई ढवळे यांच्यासह असंख्य भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# सुनील केदार यांच्या जामिनावर उत्तर दाखल करा, न्यायालयाची सरकारला नोटीस...

**वृत्तसंस्था/नागपूर**


नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील (एनडीसीसी) घोटाळा प्रकरणात झालेल्या शिक्षेनंतर माजी मंत्री सुनील केदार यांनी जामिनासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली आहे. त्यावर उच्च न्यायालयाने राज्य शासनाला नोटीस बजावत शनिवारपर्यंत (ता. ६) उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले असून ९ जानेवारी रोजी या जामीन अर्जावर सुनावणी होणार आहे. केदारांच्या जामीनअर्जावर बुधवारी न्यायमूर्ती ऊर्मिला जोशी-फलके यांच्या समक्ष सुनावणी झाली. जिल्हा व सत्र न्यायालयाने त्यांच्या जामीन, शिक्षेला व दोषसिद्धतेला स्थगिती या विनंतीवरील अर्ज ३० डिसेंबर रोजी फेटाळल्यावर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. उच्च न्यायालयात त्यांनी केवळ शिक्षेचे निलंबन व जामिनासाठी अर्ज केला आहे. आज झालेल्या सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयाने राज्य शासनाला नोटीस बजावत शनिवारपर्यंत उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले. तसेच, पुढील सुनावणी मंगळवारी (ता. ९) निश्चित केली.पण, केदार यांच्या वकिलांना बाजू मांडण्याच्या तयारीसाठी वेळ मिळावा म्हणन उत्तराची प्रत सुनावणी पूर्वीच सुपूर्द करावी, असेही नमूद केले. एनडीसीसी बँक घोटाळा प्रकरणात दोषी आढळल्याने २२ डिसेंबरला न्यायालयाने केदार यांच्यासह सहा जणांना पाच वर्षांचा सश्रम कारावास आणि १२ लाख ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. सर्वच आरोपींनी जामिनासाठी अर्ज केला होता. केदारांशिवाय अन्य आरोपींनी दंडाची रक्कम जमा केली नाही. त्यामुळे केवळ केदार यांच्याच अर्जावर सुनावणी झाली होती. आता इतरांच्या जामिनावर सत्र न्यायालयात उद्या (ता. ४) सुनावणी होणे अपेक्षित आहे. कनिष्ठ न्यायालयात सुनील केदार यांच्या प्रकरणावर आणि जामिनावरील सुनावणी दरम्यान अ‍ॅड. देवेंद्र चौहान यांनी बाजू मांडली. परंतु, उच्च न्यायालयात केदारांची बाजू वरिष्ठ अधिवक्ता सुनील मनोहर मांडत असून अ‍ॅड. चौहान त्यांना सहकार्य करीत आहेत. तसेच, राज्य शासनातर्फे विशेष सरकारी वकील व नाशिकचे जिल्हा सरकारी वकील अजय मिसार यांनी व्हर्च्युअल माध्यमातून बाजू मांडली. केदार यांनी वरिष्ठ अधिवक्त्यांना नियुक्त केल्यामुळे आता राज्य सरकारसुद्धा या प्रकरणी एका नामांकित वरिष्ठ अधिवक्त्याची विशेष सरकारी वकीलपदी नियुक्ती करण्याची शक्यता वर्तविली जात आहे.




# जळगाव जामोद तालुक्यातील विद्यार्थ्याचा अकोल्यात खून

**जनसंचलन / जळगाव जामोद**

शिक्षणासाठी अकोला येथे गेलेल्या तालुक्यातील विद्यार्थ्याचा धारधार शस्त्राने खून। केल्याची घटना १ जानेवारी रोजी अकोला येथील तोष्णीवाल लेआऊट भागात घडली. याबाबत सिव्हील लाइन पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. तरोळा ता. जळगाव जामोद येथील विशाल मधुकर झाटे वय १८ हा विद्यार्थी अकोला येथे इयत्ता १२ वीच्या शिक्षणासाठी गेला होता. त्याने अकोला शहरातील कृषी नगर जवळच्या तोष्णीवाल लेआऊटमध्ये भाड्याने खोली केली होती. तो १ जानेवारी रोजी रात्री ८ ते ९ वाजताच्या दरम्यान जेवन करुन आपल्या खोलीवर परत येत असतांना सतीश आठवले वय २१ रा. न्यू भीमनगर कृषीनगर, मंगल बाबुलाल चव्हाण वय ३१ रा. नेहरुनगर, राहुल गणेश तायडे वय २१ रा.न्यू भीमनगर यांनी संगनमत करुन रस्त्यात अडवून विशालवर धारधार शस्त्राने वार केले. यावेळी तो गंभीर जखमी होऊन कोसळला. ही माहिती सिव्हील लाईन पोस्टेला कळताच ठाणेदार प्रदिप क्षिरसागर यांनी पथकासह घटनासाठी धाव घेतली. याबाबत उपरोक्त आरोपींचा शोध घेवून या तिघांनाही अटक केली आहे. तर विशाल झाटे यांच्या मृत्यूप्रकरणी पोलिसांनी कलम ३०२, ३४ भादंविचा गुन्हा दाखल केला आहे. विशाल हा आईवडीचा एकुलता एक मुलगा होता.



# शिंदे गटाच्या खासदार भावना गवळी यांना इन्कम टॅक्सची नोटीस

**वृत्तसंस्था/मुंबई**

शिंदे गटाच्या खासदार भावना गवळी यांना आयकर विभागाने नोटीस बजावली आहे. विविध संस्थांच्या माध्यमातून मनी लॉन्ड्रिंग केल्याचा आरोप भावना गवळी यांच्यावर झाला होता. यातीलच एका प्रकरणात भावना गवळी यांना ही नोटीस बजवण्यात आल्याचे समजते. १८ कोटींचा गैरव्यवहार आणि ७ कोटींची रोकडची चोरी या प्रकरणात भावना गवळी यांच्याविरोधात तक्रार झाली होती. आता या सर्वाचा तपशील भवान गवळी यांना द्यावा लागणार आहे. भावना गवळी या वाशिम-यवतमाळच्या शिवसेना शिंदे गटाच्या खासदार आहेत. भावना गवळी यांच्या महिला उत्कर्ष प्रतिष्ठान आर्थिक व्यवहारा प्रकरणी २९ डिसेंबर रोजी आयकर विभागाने नोटीस (बजावली आहे. भावना गवळी यांना ५ जानेवारी पर्यंत आयकर विभागाला उत्तर सादर करावा लागणार आहे. १८ कोटी १८ लाख ४० हजार ४६७ रुपयांच्या गैरव्यवहार आणि ७ कोटी रोख रुपयांच्या चोरी बाबत १२ मे २०२० रोजी रिसोड पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल झाली होती. या आर्थिक व्यवहार संदर्भातील विवरण त्यांना आयकर विभागामध्ये सादर करावालागणार आहे. यापूर्वी महिला उत्कर्ष प्रतिष्ठानमधील मनी लॉन्ड्रिंगप्रकरणी भावना गवळी यांना ईडीकडून समन्स



देखील बजावण्यात आले होते. भावना गवळी या ईडीच्या फेऱ्यात अडकल्या होत्या. एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी करत भाजपच्या मदतीने राज्यात नवे सरकार स्थापन करत उद्धव ठाकरेंना धक्का दिला. एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरीमुळे शिवसेना पक्षात उभी फुट पडली. या दरम्यानच भावना गवळी या उद्धव ठाकरे यांची साथ सोडून शिंदे गटात सहभागी झाल्या.

# समृद्धीवर ट्रक उलटून दोघे किरकोळ जखमी

## नागपूर कॉरिडोर चॅनल नंबर ३२६.२ वरील घटना

**जनसंचलन/मलकापूर पांग्रा**




नाशिक येथून कांदा व ऑइल कॅन बिरामध्ये घेऊन जाणाऱ्या ट्रकचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून झालेल्या अपघातामध्ये चाकल शिवगोविंद (रा. गुरबानसरा, युतपी व सर्वन यादव (२६) हे दोघे जखमी झाले. २ जानेवारी रोजी दुपारी हा अपघात घडला. (यूपी ६१-टी-९८८२) द्वारे ते समृद्धी महामार्गाद्वारे जात होते. दरम्यान, चॅनल क्र. ३२६.२ वर ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने ट्रक पलटी झाला होता. यामध्ये चालक व वाहक किरकोळ जखमी झाले. त्यांना तातडीने नजीकच्या रुग्णालयामध्ये उपचारासाठी हलविण्यात आले. या अपघातानंतर महामार्ग पोलीसांनी त्वरित घटनास्थळी पोहोचत वाहतूक सुरळीत केली. सोबतच वाहनामध्ये अटकलेल्या दोघांना बाहेर काढले. पीएसआय गजानन उज्जैनकर, पोलिस कॉन्स्टेबल हरमकर, क्यूआरव्ही स्टेशनचे हनुमान जायभाये, कन्हैया काळे, कैलास आघाव व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यासाठी त्यांना मदत करत जखमींना रुग्णालयात पाठवले.

# व्हॉईस ऑफ मीडियाच्या आरोग्य शिबिराला पत्रकारांचा उदंड प्रतिसाद...

**जनसंचलन/ बुलढाणा**

समाजाच्या आरोग्याची काळजी करणारे पत्रकार स्वत:कडे कायम दुर्लक्ष करत असतात. वाढलेली स्पर्धा असो किंवा धावपळीचे आयुष्य, यात आरोग्यविषयक समस्या वाढतात. त्यामुळे पत्रकारांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेता व्हॉईस ऑफ मीडियाच्या माध्यमातून सेवा कार्याचा हा यज्ञ कायम तेवत ठेवणार, असे प्रतिपादन प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के यांनी गुरुवारी येथे केले. बुलढाणा येथील पत्रकार भवन परिसरात देशातील पत्रकारांची सर्वात मोठी संघटना असलेल्या व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने पत्रकारदिनाचे औचित्य साधून ४ जानेवारी २०२४ रोजी तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिराला पत्रकारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सकाळी ९ वाजता आरोग्य शिबिराला सुरुवात झाली. रक्त तपासणी, शुगर, बीपी, हृदयविकारासंदर्भातील तपासण्या यावेळी करण्यात आल्या. तब्बल ८० पेक्षा अधिक पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांची तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी करून औषधोपचार सुचविले. यानंतरही तीन दिवस नेत्ररोगतज्ज्ञ, हृदयरोग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनात पुन्हा एकदा पुढील उपचार केले जाणार आहेत. त्याची तारीख देखील लवकरच घोषित होईल. आज पार पडलेल्या शिबिरामध्ये जिल्हा रुग्णालयाच्या चमूसह खासगी वैद्यकीय तज्ज्ञांनीदेखील सेवा दिली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण, अतिरिक्त जिल्हाशल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांच्या मार्गदर्शनामध्ये डॉ. आशिष लोखंडे, डॉ. वसीम चौधरी, डॉ. मनीषा चव्हाण, डॉ. वीरेंद्र काटकर, डॉ. अनुप इंगळे, नितीन श्रीवास्तव, ज्ञानेश्वर मुळे, लखन सरकटे, सिद्धार्थ जाधव, अभिजीत राजपूत, जयदीप दुपटे, हरिदास अंभोरे, रवींद्र गवई, ए. चव्हाण, कविता किरोचे, शेख अखिल, जितू यमले व मंगेश दलाल यांच्यासह सहकाऱ्यांनी शिबिरात आपली सेवा दिली. यावेळी नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. राहुल बाहेकर, कार्डियोलॉजिस्ट डॉ. नितीन सोनुने यांनीदेखील भेट दिली.

# केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांचा २ दिवस बुलडाणा जिल्हा दौरा...

## शासकीय योजनांचा जागर, विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासकीय योजनांची जनजागृती

**जनसंचलन/बुलढाणा**

विविध योजनेंतर्गत पात्र असलेल्या परंतु लाभ न मिळालेल्या वंचित लोकांपर्यंत विविध योजनेचे लाभ पोहोचविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनामार्फत जिल्ह्यात विकसित भारत संकल्प यात्रेचे २६ जानेवारीपर्यंत आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजनांचा जिल्ह्यातील ग्रामीण नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वेळोवेळी जिल्हा प्रशासनाच्या वतीने केले आहे. आयुष्मान भारत, पीएम गरीब कल्याण अन्न योजना, दीनदयाल अंत्योदय योजना, पीएम आवास योजना, पीएम उज्वला योजना, पीएम विश्वकर्मा, पीएम किसान सन्मान, किसान क्रेडीट कार्ड (केसीसी), पीएम पोषण अभियान, हर घर जल-जल जीवन मिशन, स्वामित्व, जन धन योजना, जीवन ज्योती बीमा योजना, सुरक्षा बीमा योजना, अटल पेन्शन योजना, पीएम प्रणाम आणि नॅनो फर्टीलायझर आदी योजनांचा या यात्रेमुळे नागरिकांना लाभ उपलब्ध होणार आहे. या संकल्प यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी केंद्रीय कामगार, श्रम आणि पर्यावरण, वने तसेच पर्यावरणीय बदल मंत्री भूपेंद्र यादव हे शनिवार (दि.६)पासून जिल्ह्यात दोन दिवसांच्या दौ-यावर येत आहेत. केंद्रीय मंत्री श्री. यादव यांच्या हस्ते शनिवार (दि.६) रोजी सिंदखेड राजा तालुक्यातील सिनगाव जागीर येथे सकाळी १०.३० वाजता केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या दालनाचे उद्घाटन होईल. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील खासदार प्रतापराव जाधव, आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, आमदार श्रीमती श्वेताताई महाले व सर्व प्रशासकीय यंत्रणेच्या प्रमुखांची उपस्थिती राहणार आहे. तत्पूर्वी प्रास्ताविकातून विकसित भारत संकल्प यात्रेबाबतची माहिती दिल्यानंतर प्रतिज्ञा घेण्यात येईल. कार्यक्रमस्थळी केंद्र शासनाच्या प्रमुख विविध योजनांची चित्रफितीच्या माध्यमातून माहिती नागरिकांना देण्यात येईल. त्यानंतर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना योजनांचे लाभ वितरीत करण्यात येणार आहेत. यावेळी ङमेरी कहानी मेरी जुबानीफ्च्या माध्यमातून लाभार्थी आपले मनोगत व्यक्त करतील. या अनुषंगाने आमदार राजेंद्र शिंगणे आणि केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव हे नागरिकांना केंद्र शासनाच्या विविध योजनांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करतील. सदर कार्यक्रमानंतर खामगाव नगर पालिका येथील कार्यक्रमात आमदार ॲड आकाश फुंडकर, आमदार डॉ. संजय कुटे व श्रीमती श्वेताताई महाले आणि केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव हे नागरिकांना केंद्र शासनाच्या विविध योजनांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी खामगाव तालुक्यातील जनुना येथे २.३० वाजता ङअटल आनंद वन घन वन योजनाफ आणि मियावाकी पद्धतीच्या घनदाट झाडांच्या प्रकल्पाचे मान्यवरांच्या हस्ते उदघाटन होईल. त्यानंतर २.४५ वाजता खामगाव येथील



विभागीय वन कार्यालयाचे लोकार्पण होईल. तसेच केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या दालनाचे उदघाटन होणार आहे. दुसऱ्या दिवशी रविवार (दि. ७) रोजी सकाळी केंद्रीय मंत्री श्री. यादव यांच्या हस्ते शनिवार (दि.६) रोजी संग्रामपूर तालुक्यातील बावनवीर येथे सकाळी १०.३० वाजता केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या दालनाचे उदघाटन आयोजित केले आहे. यावेळी माजी मंत्री, आमदार डॉ. संजय कुटे, ॲड आकाश फुंडकर, श्रीमती श्वेताताई महाले आणि केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव हे नागरिकांना केंद्र शासनाच्या विविध योजनांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करतील. संकल्प यात्रेच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीत जावून लाभ न मिळालेल्या वंचित नागरिकांना केंद्र व राज्याच्या विविध योजनांचा लाभ देण्यात येणार असून, नाव नोंदणी करण्यात येणार आहे. या संकल्प यात्रेच्या माध्यमातून नागरिकांनी लाभ प्राप्त करून घ्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत



व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी

| Size | 1 Month | 15 Day | 7 Day | Hight | Width |
|---|---|---|---|---|---|
| 8x8 cm | 5000/- | 3500/- | 2000/- | 8 cm | 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | 5 cm | 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | 5 cm | 23 cm |

एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.

**One Day**
Full Page= 8000/-
1/2 Page= 5000/-

| Price | Hight | Width |
|---|---|---|
| 2600/- | 12 cm | 12 cm |
| 1800/- | 8 cm | 10 cm |
| 1300/- | 8 cm | 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्कः
अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com